# ती कशी ? तू कशी ?

ना. सी. फडके

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**ती कशी ? तू कशी ? : ना. सी. फडके**

© **सुरक्षित**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
२२ ऑक्टोबर, २०१३

**किंमत**
₹ २००/-

# ती कशी ? तू कशी ?

# १

‘बॉम्बे आर्ट सोसायटी’चं वार्षिक चित्रकलाप्रदर्शन म्हणजे कलाकारांच्या जगात विशेष महत्त्वाची समजली जाणारी एक घटना असते. या प्रदर्शनात मिळणारी पारितोषिकं बहुमानाची समजली जातात. कलाकारांमध्ये त्यासाठी स्पर्धा असते. प्रदर्शनाच्या आधी कित्येक दिवसांपासून जवळचे, दूरचे चित्रकार आणि शिल्पकार प्रदर्शनात मांडण्यासाठी आपल्या कलाकृती तयार करीत असतात. कलाकृती स्वीकारली जाणं आणि प्रदर्शनात मांडली जाणं हाच एक बहुमान समजला जातो. वॉटर कलर, ऑइल कलर, लॅन्डस्केप, पोर्ट्रेट, शिल्प अशा वेगवेगळ्या शाखांतील कृतींची प्रतवारी लावणाऱ्या परीक्षक समितीच्या निर्णयाकडे लोकांच लक्ष लागलेलं असतं. एकंदर प्रदर्शनात सर्वोत्कृष्ट ठरणाऱ्या कलाकृतीला जे सुवर्णपदक देण्यात येतं ते कुणाला मिळतं याविषयी कलाकारांत आणि सामान्य जनतेतही विलक्षण उत्साह असतो. पारितोषिकांचा निकाल जाहीर झाल्यानंतर तज्ज्ञ लोकांत, वृत्तपत्रांत उलट सुलट टीका होते, आणि या टीकेचे पडसाद सामान्य लोकांच्या खाजगी चर्चेतही कित्येक दिवस उमटत राहतात.

१९२६ साली परीक्षकांच्या सुवर्णपदकासंबंधीच्या निकालानं खूपच खळबळ उडाली.

त्या सालचं सुवर्णपदक अग्रवाल नावाच्या चित्रकारानं काढलेल्या तैल रंगातल्या पोर्ट्रेटला मिळायला हवं होतं असं सामान्य लोकांचं आणि कित्येक तज्ज्ञांचही मत होतं. अनेक मराठी, गुजराथी, इंग्रजी वृत्तपत्रांतही असंच मत व्यक्त करण्यात

आलं, आणि एका नवोदित कलाकारावर अन्याय केल्याबद्दल परीक्षक मंडळाची खरडपट्टी काढण्यात आली. प्रदर्शन चालू असताना नेहमी या पोर्ट्रेटपुढेच प्रेक्षकांची सगळ्यांत जास्त गर्दी झालेली दिसली होती. या कलाकृतीला सुवर्णपदक खचित मिळणार असे अभिप्राय बहुसंख्य वृत्तपत्रांनी दिले होते. इतकंच नव्हे तर फार लोकांना ही कलाकृती अजून बघावयाची आहे, तेव्हा प्रदर्शनाची मुदत आणखी चार दिवस वाढविण्यात यावी अशी वृत्तपत्रांत पत्रं लिहून लोकांनी मागणी केली होती, आणि प्रदर्शन समितीनं त्याप्रमाणे मुदत वाढविलीही होती. अशा प्रकारे लोकाग्रहास्तव प्रदर्शनाची मुदत वाढविण्यात आल्याचा प्रदर्शनाच्या इतिहासातला हा पहिलाच प्रसंग होता. आणि तो घडवून आणला होता अग्रवालच्या त्या पोर्ट्रेटनं.

तैलरंगातल्या त्या पोर्ट्रेटखाली सही होती 'लीला अग्रवाल' या सहीवरून बहुतेक प्रेक्षकांची अशी समजूत होती की हे पोर्ट्रेट काढणारी व्यक्ती स्त्री असली पाहिजे. कित्येक वृत्तपत्रांचीही अशीच समजूत झाली होती. मीदेखील प्रथम असंच समजत होतो की लीला अग्रवाल स्त्री असली पाहिजे.

त्या सुमारास 'रत्नाकर' नावाचं मासिक मी नुकतंच काढलं होतं. त्याचा बोलबाला अल्पकाळात बराच झाला होता. या मासिकाच्या प्रत्येक अंकात कुणातरी एका चित्रकाराची कलाकृती तीन रंगात छापून आम्ही वाचकांना सादर करीत होतो. 'रत्नाकर'च्या प्रत्येक अंकासाठी एक नवं सुंदर चित्र मिळविणं ही एक मोठीच कामगिरी होती. या कामगिरीच्या निमित्तानं त्रिनदाद, आगासकर, लाड, परांडेकर, पीठावाला, हळदणकर, केतकर अशा त्या वेळच्या अग्रेसर नामांकित चित्रकारांशी माझ्या ओळखी झाल्या होत्या. मुंबईच्या जे. जे. स्कूल ऑफ आर्टचे त्या वेळचे प्रिन्सिपॉल श्री. सॉलोमन यांच्याशीही यानिमित्तानं माझा परिचय झाला होता. मासिकाच्या प्रत्येक अंकात एक उत्तम तीनरंगी चित्र देण्याची आमची धाडसी कल्पना सॉलोमन यांना फार आवडली होती, आणि मराठी वाचकांत चित्रकलेची अभिरुची वाढविण्याच्या आमच्या प्रयत्नाचं त्यांना विशेष कौतुक वाटत होतं. आम्हाला सर्व प्रकारचं साहाय्य देण्याचं त्यांनी कबूल केलं होतं. या कारणानं श्री. सॉलोमन यांच्याशी माझा परिचय दाट होत गेला होता. त्यांच्या बंगल्यावर मी पुष्कळदा जात असे आणि केव्हाही गेलो की चित्रकथेतल्या अनेक गोष्टींविषयी ते माझ्याशी बोलत असत. नवचित्रकलेचा उदय त्या सुमारास झाला होता, आणि ती नवी लाट इकडे भारतात



येण्याची चिन्हं दिसत होती. चित्रकलेतील या नवमतवादाविषयी श्री. सॉलोमन यांची मतं फार कडक होती. माझ्याशी बोलताना ते ती वारंवार बोलून दाखवीत.

सॉलोमन यांच्याकडूनच मला प्रथम कळलं की 'लीला अग्रवाल' स्त्री नव्हती. लीलाधर नावाचा तो एक पंचवीस वर्षांचा तरुण पुरुष होता.

सॉलोमननी एके दिवशी त्याला मुद्दाम बोलावून घेऊन त्याचा माझा परिचय करून दिला. आधी त्यांनी मला सांगितलंच होतं की, ''हा छोकरा फार देखणा आहे. पुरुषाचं सौंदर्य कसं असावं याचा नमुना आहे तो. त्याचं एक पोर्ट्रेट मी सहज गंमतीनं केलंय. दाखवू का तुम्हाला? ..''

सॉलोमनच्या बैठकीच्या खोलीत लीलाधरशी हस्तांदोलन करताना त्याच्याकडे मी बघितलं तेव्हा माझ्या मनात आलं की, या तरुणाच्या सौंदर्याची जी तारीफ सॉलोमननी केली ती कमीच म्हणावी लागेल. होतं खरंच या तरुणाचं रूप अत्यंत सुंदर ! सॉलोमननी काढलेल्या त्याच्या मर्दानी सौंदर्याचा आलेख त्याच्या प्रत्यक्ष दर्शनापुढे अगदी फिका पडण्यासारखा होता. .. आणि त्याचं सौंदर्य ज्याप्रमाणे दुर्मीळ होतं त्याप्रमाणेच त्याचं बोलणं चालणं मोठं आकर्षक होतं. त्याच्या नुसत्या परिचयावर माझं समाधान होण्यासारखं नव्हतं. त्याच्याशी अधिक जानपछान झाली पाहिजे असं मला वाटलं....

लीलाधरच्या ज्या चित्रावरून खळबळ उडाली होती, त्या चित्राला त्यानं नाव दिलं होतं, "Symphony in Gold and Silver !" (सोनेरी आणि चंदेरी रंगाचं संगीत !) आणि या आकर्षक नावाला साजेलसा होता खराच चित्रातला अत्यंत मनोरम असा रंगविलास ! त्या चित्रात जलप्रवाहाच्या काठावर एक तरुण स्त्री उभी होती. तिनं स्नान नुकतंच आटपलं होतं. अंग पुसलं होतं. तिचं सगळं उत्तरांग उघडं होतं. वक्षभागाच्या जरा खाली पांढराशुभ्र टर्किश टॉवेल तिनं लपेटून डाव्या हातानं अलगद धरला होता, तो तिच्या गुडघ्यापर्यंतही पोचला नव्हता. तिच्या अर्ध्या मांड्या, पोटऱ्या आणि पावलं उघडीच होती. टॉवेल सावरून धरणाऱ्या तिच्या डाव्या हाताची बोटं तिच्या उजव्या स्तनाला लागली होती. त्या तिच्या सुकुमार बोटांवर तिचं स्तनमंडल आपला भार टाकून स्थिर झाल्यासारखं भासत होतं. तिनं आपला उजवा हात उचललेला होता, त्याचा तळवा तिच्या मानेवरच्या केशसंभारावर तिनं टेकला होता. तिला कुणाचीतरी चाहूल लागली असावी. तिच्या मुद्रेवर आश्चर्य, किंचित

भय आणि लज्जा असे भाव दिसत होते. माथ्यावरच्या सूर्याचा प्रकाश पर्णराजीच्या जाळीतून तिच्या अंगावर पडला होता. तिच्या आजूबाजूस रानगवताच्या गालिचात पांढऱ्या पिवळ्या फुलांची गर्दी उसळलेली होती. एकंदर चित्रात अनेक रंग होते परंतु चकाकणारा पांढरा रंग आणि सोनेरी रंग या दोन रंगांचा विलक्षण परिणामकारक संवाद पाहणाराच्या मनावर एकदम ठसण्यासारखा होता. लीलाधरनं त्या चित्राला जे नाव दिलं होतं ते अत्यंत उचित वाटत होतं !... प्रदर्शनाला भेट देणाऱ्या साऱ्या लोकांना लीलाधरच्या या चित्रानं वेड लावलं होतं यात आश्चर्य कसलं?...

सॉलमन साहेबांनी मला एकदा सांगितलं होतं की, ''लीलाधरनं या गाजलेल्या चित्रासाठी ज्या स्त्रीचा मॉडेल म्हणून उपयोग केला आहे, ती त्याची लग्नाची बायको आहे, की त्याची प्रेयसी आहे ते मला नक्की माहीत नाही; परंतु या स्त्रीचा उपयोग जर त्याला नेहमी करता आला तर तो आणखी एकाहून एक अशी सुंदर चित्र काढील आणि आपलं नाव गाजवील याविषयी मला किंचितदेखील शंका नाही.''

मलादेखील नव्हती.

आणि सॉलोमन साहेबांच्या वाट्याला जे भाग्य आलं नव्हतं ते लीलाधरची आणि माझी दोस्ती झाल्यावर जेव्हा माझ्या वाट्याला आलं तेव्हा माझी अधिक खात्री झाली की, चित्रकारांच्या जगात लीलाधर आता आणखी कीर्ती मिळविणार. एवढ्या असामान्य कोटीतल्या सौंदर्याचं मॉडेल हक्काचं माणूस मिळाल्यावर लीलाधरच्या कलाचातुर्याला बहर आल्याशिवाय कसा राहील ?

मला वाटलं होतं, जिच्यावरून लीलाधरनं प्रदर्शनात गाजलेलं चित्र तयार केलं ती स्त्री फार तर वीस वर्षांची असेल. लीलाधरनं आपल्या राहत्या बिऱ्हाडी मला नेलं आणि 'ही माझी मेरी' असं म्हणून तिचा माझा परिचय करून दिला तेव्हा ती अगदीच ऐन विशीतली किशोरी नव्हती हे माझ्या लक्षात आलं; परंतु तिचं वय चोवीस-पंचवीसपेक्षा जास्त वाटलं नाही मला... आणि मग कितीक दिवसांच्या परिचयानंतर जेव्हा मेरी बत्तीस वर्षांची असल्याचं तिनंच मला सांगितलं तेव्हा मी चकितच झालो. स्त्रिया आपलं वय कधी सांगत नाहीत, सांगायचं झालं तर कमी करून सांगतात, असं असताना ही मेरी आपलं खरं वय सांगत होती, याचं तर आश्चर्य मला वाटलंच; परंतु शिवाय, तिचं तारुण्य कसं ताजंतवानं आणि शाश्वत शाबूत राहिलं होतं, याचंदेखील मला फार आश्चर्य वाटलं. मी बत्तीस वर्षांची आहे



असं ती आपल्या तोंडानं सांगत होती खरं; परंतु ती तशी मुळीच दिसत नव्हती. तिची अंगकांती, तिच्या अवयवांचा तजेलदार टंचपणा, तिच्या चेहऱ्यावरील ऐन पंचविशीतला गोडवा, तिच्या पुष्ट स्तनांचा वस्त्रातूनही कळणारा कोवळेपणा – या साऱ्या गोष्टींची साक्ष अशीच होती की तिचं वय पंचवीसहून अधिक नव्हतं !

लीलाधर आणि मेरी ही दोन्ही माणसं जशी मला आवढली त्याप्रमाणे त्या दोघांना मीही आवडल्यासारखं दिसलं. त्यांच्याकडे मी वरचेवर जाऊ लागलो. मुंबईत मी एकटाच राहात होतो. माझं बिऱ्हाड नव्हतं; परंतु केव्हाही 'चला माझ्याबरोबर जेवायला' असं मी म्हटलं की ती दोघं माझ्याबरोबर एखाद्या हॉटेलात येत असत. प्रिन्सेस स्ट्रीटवर 'पिअर्स' नावाचं एक उत्कृष्ट हॉटेल त्या दिवसांत होतं. मेरीला ते सगळ्यात जास्त आवडत असे. तिथे सर्व प्रकारची मद्यं मिळत असत, आणि तिथलं जेवण फार रुचकर असे आणि मुख्य म्हणजे ती जागा फार निवांत होती. त्या हॉटेलच्या दुसऱ्या मजल्यावर आम्ही तिघं घटकान् घटका बोलत बसत असू. रात्री अमुक वाजता हॉटेल बंद केलं पाहिजे असा कायदा त्या वेळेस नव्हता.

लीलाधर आणि मेरी यांची हकीगत मला समजली ती कल्पित कथेपेक्षाही अधिक चमत्कृतिपूर्ण होती.

मुंबईच्या जे. जे. हॉस्पिटलसमोर जो मोहल्ला होता त्यात बंद तोंडाच्या अनेक समांतर गल्ल्या होत्या. या गल्ल्यांतून वस्ती होती ती मुसलमान, अरब, ज्यू अशा जातीतल्या लोकांची. मात्र मेडिकल कॉलेजात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना हा मोहल्ला कॉलेजच्या नजीक, आणि म्हणूनच सोयीचा असल्यामुळे बरेच विद्यार्थी त्या वस्तीत खोल्या घेऊन राहात असत. लीलाधरशी परिचय होण्यापूर्वी या वस्तीत मी कधी कधी गेलो होतो. ओबायदुल्ला अन्सारी नावाच्या एका पंजाबी तरुणाशी माझी ओळख झाली होती. तो मेडिकल कॉलेजात शिकत होता. त्याच्या खोलीवर मी पुष्कळ वेळा गेलो होतो. अस्सल पहाडी पंजाबी गीत कसं असतं ते त्याच्या संगतीतच मला प्रथम कळलं होतं.

जे. जे. हॉस्पिटलच्या समोरच्या या मोहल्ल्यात 'आर्मीनियन लेन' नावाची एक गल्ली होती. या गल्लीला हे नाव पडलं होतं याचं कारण उघडच हे होतं की इथे इतर जातींचे, देशांतले व धर्मांचे लोक जरी राहत होते तरी फार दिवसांपासून इथे वस्ती होती मुख्यत: 'आर्मीनियन' लोकांची. या गल्लीतल्या एका चाळीत दुसऱ्या

मजल्यावर लीलाधरचं बिऱ्हाड होतं. त्याचा आणि मेरीचा परिचय होण्याच्या आधीपासून तो या ठिकाणी राहात होता. अग्रवाल कुटुंब हे वऱ्हाडातलं एक कर्जबाजारी कुटुंब होतं. लीलाधरचा थोरला भाऊ गदाधर पण खानदान डॉक्टरीची पदवी घेतल्यानंतर उच्च अभ्यासक्रम पार पाडण्यासाठी विलायतेला गेला होता. तो 'जे. जे.' चा विद्यार्थी असताना त्यानं ही जागा घेतली होती. तो इंग्लंडला जायला निघाला त्याच सुमारास स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश करण्याच्या हेतूनं लीलाधर मुंबईत येऊन दाखल झाला. थोरल्या भावाची खोली त्याला अनायासे मिळाली. या खोलीत तो राहू लागला. स्कूल ऑफ आर्टमध्ये शिकू लागला. लहानपणापासून त्यानं तालमीचा, कुस्तीचा, लाल बोथाटी, दांडपट्टा खेळण्याचा षोक केला होता. भायखळ्याच्या विभागात एक फार प्रसिद्ध आखाडा होता, तिथे आपले हे षोक तो पुरे करू लागला.

या आर्मीनियन गल्लीत जोनाथन नावाचा एक आर्मीनियन राहत असे. मेरी ही त्याची बायको. जोनाथनचं आडवान होतं 'सारोयान.' तो मोठ्या अभिमानानं सांगत असे, ''आमच्या घराण्याची एक शाखा अमेरिकेत जाऊन राहिली आहे. त्या शाखेतले पुरुष मोठे कर्तबगार निघाले आहेत. शिकले सवरले आहेत. कुणी गायक होताहेत, कुणी लेखक होताहेत.'' (विल्यम सारोयानच्या साहित्याशी पुढे कित्येक वर्षांनी माझा परिचय झाला तेव्हा माझ्या मनात साहजिक आलं, मुंबईच्या आर्मीनियन गल्लीत राहणारा मेरीचा नवरा जोनाथन या विख्यात लेखकाचा कोणी सगासोयरा तर नसेल?).... जोनाथन म्हणे, ''आमच्या घराण्याची जी शाखा इकडे मुंबईत येऊन राहिली, तिच्यातल्या पुरुषांनी शिकण्यासवरण्याकडे लक्ष दिलं नाही. त्यांनी व्यापार केला. आणि व्यापार केला तो कुठे दुकान घालून नव्हे, तर रस्तोरस्ती हिंडणाऱ्या विक्रेत्याचा पेशा पत्करून. मी तोच धंदा करतो. मला मुलंबाळं असती तर त्यांनादेखील हाच धंदा मी करायला सांगितला असता.''... हे अखेरचे शब्द उच्चारताना त्याचा आवाज सद्‌गदित होत असे. जणू त्याला मूलबाळ नव्हतं हे त्याच्या आयुष्यातलं मोठं शल्य होतं... छोटे छोटे किमती गालिचे, निरनिराळ्या प्रकारच्या सरबतांच्या बाटल्या, आणि तऱ्हेतऱ्हेचे 'केरबा' मणी या वस्तूंची विक्री मुंबईच्या वेगवेगळ्या भागांत हिंडून जोनाथन करीत असे...

गालिच्यांचा भारा उजव्या डाव्या खांद्यावर पेलून धरलेला आहे, सरबतांच्या बाटल्यांनी भरलेली भलीमोठी चटईची टोकरी गळ्यात अडकविलेली आहे,



लहानमोठ्या रंगीबेरंगी 'केरबा' मण्यांच्या माळा हातात, अशा थाटातल्या जराशा ठेंगण्याच, मजबूत बांध्याच्या, झुबकेदार मिशांच्या, लालसर गोऱ्यापान जोनाथनची मूर्ती ज्यांनी बघितली, आणि 'केरबा मणी केरबा !' अशी त्याची खणखणीत ललकारी ज्यांनी ऐकली, अशी ठाकुरद्वार-गिरगाव भागातली कितीक माणसं आज घटकेला हयात असतील....

अशा या जोनाथन सारोयानची बत्तीस वर्षांची अत्यंत देखणी बायको मेरी लीलाधर अग्रवालला मॉडेल म्हणून मिळाली होती आणि तिच्यावरून त्यानं तयार केलेलं चित्र प्रदर्शनातलं सुवर्णपदक न मिळाल्यामुळे गाजलं होतं...

लीलाधर आणि मेरी एकमेकांच्या दृष्टीस पडली त्या क्षणापासून ती दोघं एकमेकांवर लुब्ध झाली. जोनाथनसारख्या एका जाडजूड दांडग्या आर्मीनियन माणसाच्या लग्नाच्या बायकोला फूस लावणं आणि तिच्याशी व्यभिचार संबंध जोडणं, म्हणजे खरं म्हटलं तर एक धाडसच होतं, विशेषत: ज्या मोहल्ल्यात कडव्या वृत्तीचे मुसलमान, अरब, ज्यू, आर्मीनियन पुरुष होते त्या मोहल्ल्यात एका विवाहित स्त्रीशी वाम संबंध जोडणं ही मोठ्या साहसाची गोष्ट होती; परंतु लीलाधर वृत्तीनं जसा कलाकार होता त्याचप्रमाणे स्वभावानं भलता बेडर होता आणि शिवाय लाठी, बोथाटी, दांडपट्टा अशा विद्यांत प्रवीण असलेला पैलवान होता तो. आर्मीनियन गल्लीतले आणि आसपासचे पुरुष एवढे एकाहून एक तगडे, परंतु लीलाधर आणि मेरी यांच्यातलं प्रेमप्रकरण वाढत चालल्याचं दिसत असूनही त्याला हटकण्याची किंवा त्याच्यावर गुरकावण्याची कुणाची छाती नव्हती. लीलाधरशी मारामारी केली तर भायखळ्यावरच्या आखाड्यावरचे सारे पैलवान धावून येतील, हे आर्मीनियन गल्लीतल्या पुरुषांना उघड दिसत होतं. आपली बायको लीलाधरनं फितविली आहे, या गोष्टीची जोनाथनला कितीही चीड आली तरी जोनाथन कोणत्याही प्रकारचा प्रतिकार करू शकत नव्हता. गल्लीतले त्याचे जातवालेही काही करू शकत नव्हते....

लीलाधरच्या घराण्यातच रंगेलपणाचं आणि धाडसाचं रक्त असावं. लीलाधरचा थोरला भाऊ गदाधर डॉक्टरीचा उच्च अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला गेला होता. तिकडे असताना तो असचा मनसोक्त वागला होता. डॉक्टरीच्या अभ्यासाकडे त्याचं पूर्ण लक्ष होतं; परंतु चंगीभंगीपणाही तो यथास्थित करीत असे.